सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२३ - २०२४

## वित्त विभाग

**( प्रकाशन क्रमांक ५ )**

**( विमा )**

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ४११ ००६

२०२३

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२३ - २०२४

### वित्त विभाग

( प्रकाशन क्रमांक ५ )

# विमा

# वित्त विभागाने तयार केलेल्या कार्यक्रम अंदाजपत्रकांची यादी

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | | | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | .. | .. | वित्त विभाग (खुद्द) मंत्रालय |
| २ | .. | .. | वित्त विभाग (संचालनालय, लेखा व कोषागारे) |
| ३ | .. | .. | वित्त विभाग (विक्रीकर) |
| ४ | .. | .. | वित्त विभाग (अल्पबचत व राज्य लॉटरी) |
| ५ | .. | .. | वित्त विभाग (विमा) |
| ६ | .. | .. | वित्त विभाग (स्थानिक निधी लेखा परीक्षा) |

# अनुक्रमणिका


पृष्ठे

प्रस्तावना .. .. .. .. .. १

समग्र कार्यक्रम .. .. .. .. .. ९

कार्यक्रम--

**(१) सर्वसाधारण विमा निधी--**

(एक) प्रस्तावना .. .. .. .. .. १०

(दोन) एकूण अर्थसंकल्पीय तरतुदींबाबत कार्यक्रमनिहाय तपशील-

वित्तीय आवश्यकता व वित्तीय व्यवस्थेची साधने-तक्ता क्रमांक १ .. .. १२

वित्तीय आवश्यकता तक्ता क्रमांक २ .. .. .. १४

(तीन) कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश व वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण–

तक्ता क्रमांक ३– विमा प्रस्ताव .. .. .. .. १६

तक्ता क्रमांक ४– विमा हप्त्याची वसुली .. .. .. १८

तक्ता क्रमांक ५– निकालात काढलेले दावे .. .. .. २०

तक्ता क्रमांक ६– सहविमा / पुनर्विमा हप्ता .. .. .. २२

तक्ता क्रमांक ७– सहविमा धंदा .. .. .. .. २४

तक्ता क्रमांक ८– पुनर्विमा / सहविमा दावे .. .. .. २६

तक्ता क्रमांक ९– सहविमा दावे (देय).. .. .. .. २८

तक्ता क्रमांक १०– निव्वळ दाव्याची टक्केवारी .. .. .. ३०

तक्ता क्रमांक ११– विमा निधीची प्रगती .. .. .. ३१

प्राप्त विमा हप्ता व खर्च दर्शविणारे विवरणपत्र ‘ क ’ .. .. .. ३२

(चार) कर्मचारीविषयक सारांश : क्रमांक १-सर्वसाधारण विमा निधी .. .. ३४

कर्मचारीविषयक गोषवारा : क्रमांक २-सर्वसाधारण विमा निधी व कार्यालय जागा .. ३५

माहिती अधिकाऱ्यांची माहिती व इतर समित्या .. .. .. ३६

विमा क्षेत्रातील सन्मान्य सभासद (Fellowship) धारकांची यादी .. .. ३७

**(२) महिलांचे सक्षमीकरण कार्यक्रम** .. .. .. .. ३८

# शासकीय विमा निधी, वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## विमा संचालनालय

**प्रस्तावना**

शासकीय विमा निधी हा केंद्रीकृत कार्यक्रम म्हणून (लोक लेखा समितीने केलेल्या शिफारशीवरून) १९५१ मध्ये सुरू करण्यात आला. मूलत: हा निधी विविध शासकीय विभागाच्या विशेषत: वाणिज्यिक आणि / किंवा औद्योगिक उपक्रमांच्या (ज्यांना सामान्यपणे नेहमीच्या वाणिज्यिक / व्यापार प्रथेनुसार विमा उतरवावा लागतो) विमाविषयक गरजा पुरविण्यासाठी सुरू करण्यात आला.

**विमा निधीच्या स्थापनेमागे खालील उद्देश आहेत –**

(अ) विमा कंपन्या आकारित असलेल्या विम्याच्या हप्त्यातील नफ्याचा अंश शासनाच्या फायद्यासाठी वाचविणे.

(ब) जेणेकरून शासनाला, इतर विमा कंपन्यांबरोबरची आपल्या विम्याची मर्यादा कमी करणे शक्य होईल अशा प्रकारे एक निधी तयार करणे.

(क) शासन आणि अन्य राज्य सांविधिक महामंडळे यांच्यासाठी विम्याचा खर्च शक्य असेल त्या प्रमाणात कमी करणे,

(ड) शासकीय वाणिज्य उपक्रमांच्या बाबतीत वस्तूच्या ग्राहकांवर आणि या उपक्रमांनी दिलेल्या सेवेचा उपयोग करून घेणाऱ्यांवर विम्याचा खर्च योग्य त्या प्रमाणात हस्तांतरित करता येणे.

(इ) शासकीय हितसंबंध अंतर्भूत असलेल्या संस्था, मंडळे, महामंडळे, सर्व जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, सर्व शासकीय, निमशासकीय विभाग इत्यादींना इतर विमा कंपन्यांचा सहविमा सेवा पद्धतीखाली विमा उतरवून विमा जोखीम विभागून देण्यासाठी मान्यता देणे व विमा हप्त्याच्या स्वरूपातील महसुलातील हिस्सा जोखीम स्वीकारून मिळविणे, आणि

(ई) राज्याच्या विकासासाठी विमा निधी हे घोषवाक्य स्वीकारून विमा हप्त्याच्या स्वरूपात विकास कामासाठी विनाकर महसूल मिळवून देणे.

राज्य शासकीय विमा निधीची कार्यव्याप्ती प्रथमत: शासकीय विभागापुरती मर्यादित होती, ती विमा अधिनियम, १९३८ च्या कलम ११८-सी अन्वये भारत सरकारच्या योग्य कालावधीने वेळोवेळी सूट देण्याबाबतच्या आदेशानुसार सार्वजनिक महामंडळे, सांविधिक राज्य महामंडळे यांच्यासाठीही विस्तारित करण्यात आली. वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या विमाविषयक शासन निर्णयानुसार विमा व्यवहाराची व्याप्ती वाढली व त्यामुळे शासकीय विमा निधीच्या स्थापनेमागील उद्दिष्टातही वाढ होत गेली. राज्य शासनाने “ **राज्याच्या विकासासाठी विमा निधी** ” हे घोषवाक्य स्वीकारल्यानंतर विमाहप्त्याच्या स्वरूपात विकास कामासाठी विनाकर महसूल मिळवून देणे हे प्रमुख उद्दिष्ट झाले.

विमा अधिनियम (सुधारित), १९६८ संमत झाल्यानंतर शासकीय विमा निधी आग, सागरी व संकीर्ण विमा वर्गाखाली सर्वसाधारण विमा व्यवसाय चालू ठेवण्यास प्राधिकृत विमाकार म्हणून नोंदविला गेला. देशातील सर्वसाधारण विमा व्यवसायाचे सर्वसाधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ नुसार राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तथापि, ह्या अधिनियमाच्या कलम ३६ नुसार प्रत्येक राज्य शासकीय विमा निधीचे आपापले सर्वसाधारण विमा व्यवसाय चालू ठेवण्याचे हक्क परिरक्षित करण्यात आले. या कलमानुसार, जी शासकीय खाती, निमशासकीय खाती, राज्य सांविधिक संस्था व इतर औद्योगिक व व्यापारी संस्थांमध्ये शासनाची भागधारकता, कर्जे हमी इत्यादी स्वरूपात भरीव हितसंबंध गुंतले आहेत, यांच्या मालमत्तेच्या बाबतीत सर्वसाधारण विमा व्यवसाय करणाऱ्या राज्य शासकीय विमा निधींना हा अधिनियम लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

सरकारी खात्यांनी विविध मालमत्तांच्या विम्याबाबत पाळावयाची मार्गदर्शक तत्त्वे, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक एआयएफ-२१६५/२१, दिनांक ५ फेब्रुवारी १९६६ मध्ये निर्धारित केली आहेत. मंत्रालयातील कामाच्या स्वरूपापेक्षा शासकीय विमा निधीचे कामकाज भिन्न स्वरूपाचे, तांत्रिक व वाणिज्यिक असल्याने शासनाने शासकीय विमा निधीच्या व्यवस्थापनासाठी दिनांक १ सप्टेंबर १९७२ रोजी विमा संचालनालय ही स्वतंत्र आस्थापना निर्माण केली. या संचालनालयाचे प्रादेशिक कार्यालय

दिनांक २३ सप्टेंबर २०१९ पासून विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे प्रादेशिक कार्यालय, नागपूर या नावाने खोली क्रमांक १०२, पहिला मजला, जुने सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१ येथे सुरू करण्यात आले आहे. शासनाने शासन निर्णय / परिपत्रके / पत्रे निर्गमित केल्यानंतर विमा संचालनालयामार्फत तसेच या कार्यालयाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत विमा व्यवसायातील प्रचलित पद्धतीनुसार विमा व्यवहार हाताळले जातात. विमा स्वीकृती अथवा विमादावा निकाली काढण्यासाठी भारतीय विमा संस्था यांनी विविध विमाविषयक परीक्षांसाठी विहित केलेला अभ्यासक्रम, राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांद्वारे विमा व्यवसायातील प्रचलित कार्यपद्धती यांचा आधार घेऊन विमा व्यवहार विमा संचालनालयास करणे क्रमप्राप्त आहे. विमा संचालनालयाचा उत्तम प्रशासनासाठी भारतीय विमा संस्थेचा विमाविषयक अर्हताप्राप्त अधिकारी नियुक्त करण्यासाठी शासनाने गट-अ व गट-ब मधील भिन्न संवर्गातील पदांसाठी नियुक्ती नियम निश्चित केलेले आहेत.

दिनांक १७ जानेवारी १९७३ च्या वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक डीओआय-११७३/१४/७३-ए-४ नुसार सर्व शासकीय खाती, राज्य सांविधिक संस्था व इतर संस्थांमध्ये शासनाचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रण आहे, अशा सर्वांना त्यांच्या मालमत्तेचा विमा संचालनालयामार्फत उतरवावा लागतो.

शा. नि. एआयएफ-१९७०/संकीर्ण-२१, दिनांक ५ मे १९७० चा पुनरुच्चार करून दिनांक १६ जानेवारी १९८४ च्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक एआयएफ-२१८२/सीआर-१७४/८३/एडीएम-५ द्वारे शासनाच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अधिपत्याखालील प्रत्येक विभाग प्रमुखाने त्यांच्या मालमत्तेचा व दायित्वाचा विमा वित्तीय शिस्तीची बाब म्हणून शासकीय विमा निधीकडे उतरविणे अनिवार्य असून याबाबत अंमलबजावणी न करणे म्हणजे शासनाच्या महसुलाचे नुकसान करणे असे समजले जाईल व त्याबाबतीत शासनास योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होईल असे आदेश निर्गमित केले आहेत. मात्र कार्यवाही करण्यासाठी अद्याप स्वतंत्र यंत्रणा करण्यात आलेली नाही.

शासनाने दिनांक १९ ऑगस्ट १९९८ रोजी शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग विमासं-१७९८/प्रक्र. २८/९८/शासन हमी द्वारे कंत्राटी कामाचा विमा विमा संचालनालयाकडे वित्तीय शिस्तीची बाब म्हणून उतरविणे अनिवार्य केल्यानंतर शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय विभाग, मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, नगरपालिका इत्यादींपासून विमा उतरविण्यासाठी मोठ्या प्रमाणात विमा प्रस्ताव प्राप्त होत आहेत. त्यामुळे अलिकडच्या कालावधीत कंत्राटी कामांची विमा व्यवहारात भर पडत असून शासनास विकास कामासाठी विनाकर महसूल प्राप्त होत आहे. विमा प्रस्तावांतर्गत अंतर्भूत जोखीम व तांत्रिक बाबी अधिक असल्यास भारतीय विमा नियमन व विकास प्राधिकरण यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या व विमा संचालनालयाने नियुक्त केलेल्या सर्वेक्षकाकडून विमापूर्व परीरक्षण अहवाल प्राप्त केला जातो.

सन १९५१ पासून सन २०२१-२०२२ अखेरपर्यंत सुमारे रुपये ३६७८.९१ कोटी इतका विनाकर महसूल विमाहप्त्याच्या स्वरूपात प्राप्त झाला असून विमा दावे व विमा व्यवस्थापन यावर खर्च सुमारे रुपये १,२१६.५३ कोटी झालेला आहे. परिणामत: विकास कामासाठी राज्य शासनाची विमा संचालनालयाने विमा व्यवहार हाताळल्यामुळे सुमारे रुपये २,४६२.३८ कोटीची बचत होऊन निधी उपलब्ध झालेला आहे. (विवरणपत्र ‘ क ’) विमा संचालनालय ही आस्थापना अस्तित्वात नसती तर राज्य शासनाची ही बचत झाली नसती. ही सर्व बचत म्हणजेच राज्य शासनाचा विनाकर महसूल असून राज्याच्या विकास कामासाठी या निधीचा उपयोग होत आहे.

विमा संचालनालय हा प्रशुल्क विमाकार होता. त्यामुळे प्रशुल्कातील दर वापरले जात असत, दिनांक १ जानेवारी २००७ पासून विमा व्यवसाय पूर्णत: प्रशुल्करहित झाला आहे. त्यामुळे आता विमा संचालनालयात प्रशुल्करहित दर निर्धारण समिती गठित करण्यात आली असून समितीचा अहवाल विचारात घेऊन विमा हप्ता आकारला जातो. विमा व्यवसायातील प्रचलित दर, अटी व शर्ती यांचा विचार करून वेळोवेळी स्वीकारण्यात येणाऱ्या जोखिमेसाठी विमा हप्ता दर आकारून विमाछत्र देण्याचे काम या आस्थापनेमार्फत केले जाते. सहविमा व पुनर्विमा करताना विमा व्यवसायातील सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांच्या विमा हप्त्याच्या दराप्रमाणे भिन्न विमापत्रकांखाली विमा जोखीम स्वीकारली जाते. पुष्कळदा विमाधारक या नात्याने राज्य शासनाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादी स्वत: सहविमा सेवा पद्धतीखाली अन्य विमा कंपन्यांकडे विमा उतरवितात व विमा कालावधी पार पडल्यानंतर ही बाब विमा संचालनालयाच्या निदर्शनास येते.

विमा संचालनालय हा राज्य शासनाचा स्वयंविमा योजनेअंतर्गत निधी असल्यामुळे स्वत:चे अधिकृत (ॲडव्होकेट) पॅनल अस्तित्वात नाही. विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने तसेच जिल्हा सरकारी वकील यांच्या सेवा न्यायालयीन प्रकरणात उपयोगात आणल्या जातात. तातडीच्या न्यायालयीन प्रकरणात अपवादात्मक परिस्थितीत विमा संचालनालयाच्या विभाग प्रमुख पदावरील विमा संचालक यांच्या मान्यतेने त्या त्या क्षेत्रातील विशेष अधियोक्ता यांची नियुक्ती करून शासनाचे हित जोपासले जाते. तथापि, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लोक अदालत, तृतीय पक्ष मालमत्ता नुकसान, श्रमिक नुकसान भरपाई, ग्राहक मंच इत्यादी ठिकाणी जी प्रकरणे The Rules for the conduct of Legal Affairs Government, 1984 च्या नियम क्रमांक ९६ मधील तरतुदींनुसार सरकारी वकिलांनी हाताळणे अपेक्षित नाही. तसेच विमा संचालनालयामध्ये विधी अधिकारी पद अस्तित्वात नसल्याने विमाक्षेत्रात कार्यरत अनुभवी वकिलांची नामसूची या कार्यालयाने तयार केली आहे.

विमा संचालनालयाकडे मनुष्यबळाअभावी सर्व विमाधारकांना थेट पद्धतीने विमा सेवा दिली जात नाही. तेव्हा विमा संचालनालयामार्फत खाली नमूद केल्याप्रमाणे काम केले जाते.

**(अ) प्रत्यक्ष पद्धत**

(१) १०० टक्के विमाहप्ता रक्कम शासकीय व निमशासकीय संस्थांकडून प्राप्त झाल्यानंतर विमा संचालनालय विमापत्राखाली थेट पद्धतीने दायित्व स्वीकारून विमा दावे निकाली काढते.

(२) विमापत्राखाली स्वीकृत केलेल्या जोखिमेची व्याप्ती व विमाधारकाची सोय या बाबी विचारात घेऊन विमा संचालनालय सहविमा सेवा पद्धतीखाली सार्वजनिक क्षेत्रातील कार्यरत असलेल्या भिन्न विमा कंपन्यांकडे विशिष्ट अटींच्या अधीन राहून विमापत्राखाली जोखीम विभागून घेते, विमा दावे निकालात काढते.

(३) शासनाने कंत्राटी कामाचा शासन निर्णय निर्गमित केला, मात्र अपुरे मनुष्यबळ व एजंट / ब्रोकर सुविधांचा अभाव यामुळे कंत्राटी कामाचा व ते काम पूर्ण करण्याकरिता नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा विमा संचालनालयाकडे उतरविण्याची कार्यपद्धती पुढे नमूद केल्याप्रमाणे अंमलात आणली जात आहे.

विमा संचालनालय या आस्थापनेचे मुख्यालय मुंबई व प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे कार्यरत आहे. तसेच विमा संचालनालय ही शासनाची स्वयंविमा योजना असल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांप्रमाणे एजंट / ब्रोकर यांची सेवा विमा संचालनालयाकडे उपलब्ध नाही. शासन निर्णयानुसार संबंधित प्रकर्ता (Principal) व कंत्राटदार यांना विषयांकित विमा विमा संचालनालयाकडे उतरविणे अनिवार्य आहे. राज्य शासनाच्या स्वयंविमा योजनेतंर्गत कंत्राटी कामाचा विमा प्रकार यशस्वी करण्यासाठी मंत्रालयातील शासनाच्या खालील विभागांनी पत्रे, परिपत्रके निर्गमित केली आहेत.

(अ) नगरविकास विभाग, क्रमांक जीईएन-१०९८/१३५७/प्रक्र. १६६/९८/नवि-२४, दिनांक ३ नोव्हेंबर २००३ व क्रमांक मामपा-१००९/सं.क्र. ३९/नवि-२६, दिनांक १६ मार्च २००९,

(ब) ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीपर-२०००/प्रक्र. ८३७/परा(३५), दिनांक १५ सप्टेंबर २००३ व जीपर-२०००/प्र.क्र. ८३७/परा-८, दिनांक १३ फेब्रुवारी २००६,

(क) नगरविकास विभाग, सीआयडी/३३०३/१९७३/प्र.क्र. २३९/२००३/नवि-१०, दिनांक १६ मार्च २००३,

(ड) सार्वजनिक बांधकाम विभाग, पत्र क्रमांक संकीर्ण ०७/०५/२८५/इमारती-२, दिनांक २३ जुलै २००५.

तथापि, विमा संचालनालयाकडे शासनाची कंत्राटी कामाची विमा योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी राज्य शासनाचे शासकीय विभाग, निमशासकीय विभाग, महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, विद्यापीठे, प्राधिकरणे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, शासनाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखाली सर्व प्रकारच्या संस्था इत्यादी यांनी प्रकर्ता (Principal) या नात्याने कंत्राटीकाम कंत्राटदारांना दिल्यानंतर कंत्राटी कामाचा विमा उतरविण्यासाठीच्या कार्यपद्धतीत सुसूत्रता येण्यासाठी शासनाने दिनांक १३ जुलै २०२२ रोजी शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ४७/विमा प्रशासन, वित्त विभाग हे निर्गमित केले आहे.

**त्यानुसार शासकीय / निमशासकीय विभाग, महामंडळे / मंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा व त्यासाठी नियुक्त कामगारांचा विमा उतरविणेबाबतच्या कार्यपद्धतीचा खालीलप्रमाणे वापर करावा.**

**(अ)** प्रत्येक प्रकर्ता यांनी खालील नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरून **कंत्राटी कामाचा विमा** विमा संचालनालयाकडे उतरविण्याची दक्षता घेण्यात यावी.

१. प्रत्येक प्रकारच्या कंत्राटी कामाचे कार्यादेशात व करारनाम्यात " विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, खोली क्रमांक २६४, पहिला मजला, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दूरध्वनी क्रमांक २६५९०४०३ / २६५९०६९० व फॅक्स क्रमांक २६५९२४६१) " या कार्यालयाकडे विमा उतरविण्याची अट अंतर्भूत करण्यात यावी.

२. कंत्राटी कामाचे स्विकारपत्र व कार्यादेश कंत्राटदाराला निर्गमित करताना त्याची एक प्रत विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य या कार्यालयास अग्रेषित करावी.

३. कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे विमा संचालनालयाकडे उतरवून या संबंधीचा पुरावा सादर केलेला आहे, याची खात्री करावी. तद्नंतरच, कंत्राटी कामापोटीची देय रक्कम प्रदान करावी.

४. काही विशिष्ट परिस्थितीत कंत्राटदारास कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या अंदाजे रुपये १ (प्रति शेकडा) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर विमा संचालनालयाकडे ही रक्कम विना विलंब धनादेश / धनाकर्षाद्वारे अथवा ग्रास प्रणालीद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरित करण्यात यावी.

काही प्रसंगी असे निर्दशनास आले आहे की, संबंधित प्रकर्ता हे कंत्राटदाराच्या देय असणाऱ्या चालू देयकाच्या (Running Bill) १% रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे जमा करीत आहेत. चालू देयकाच्या १% रक्कम कपात केल्यामुळे पुरेशा विमाहप्ता अभावी विमा अधिनियमाच्या तरतुदींनुसार विमादावा देय होत नाही, याची नोंद घेण्यात यावी.

५. विमा उतरविण्यासाठी विहित नमुन्यातील विमाप्रस्तावपत्र उपलब्ध झाल्यानंतर विमा संचालनालय प्रत्येक कंत्राटी कामापोटी प्रदान करावयाची अंतिम रक्कम कळवू शकेल.

या रकमेचे समायोजन वरील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार कंत्राटदाराच्या देयकातून वळती केलेल्या व विमा संचालनालय कार्यालयाकडे हस्तांतरित केलेल्या रकमेशी करण्यात येईल. विमाहप्ता रक्कम अतिरिक्त भरलेली असल्यास ती परत करण्यात येईल. तसेच, ही रक्कम कमी असल्यास, प्रकर्ता यांनी उर्वरित विमा हप्त्याची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वळती करून प्रदान करण्यास विमा संचालनालयाला सहकार्य करणे आवश्यक आहे. संबंधित कंत्राटदार यांनी रक्कम कपात झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत विमा संचालनालयाशी संपर्क साधून कपात रक्कम समायोजनाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तद्नंतर या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार विचारात घेण्यात येणार नाही.

६. कंत्राटी कामाचा विमा संदर्भात निर्गमित करण्यात येणारी विमापत्रे ही प्रकर्ता / कंत्राटदार यांच्या संयुक्त नावे असणार आहेत. संबंधित प्रकर्ता यांनी " ना हरकत प्रमाणपत्र " सादर केल्याशिवाय विमादाव्याची रक्कम कंत्राटदारास मिळणार नाही. तेव्हा, अशाप्रकारे संबंधित प्रकर्ता यांचे आर्थिक हितसंबंध विमापत्राखाली सुरक्षित रहात असल्याने, सर्व प्रकर्ता यांनी कंत्राटदार योग्य प्रकारे विमा संचालनालयाकडे कंत्राटी कामाचा विमा उतरवित आहेत, यासंबंधी दक्षता बाळगणे आवश्यक आहे.

७. विमा संचालनालय या कार्यालयास विमाहप्ता रक्कम प्राप्त झाल्यानंतर कंत्राटी कामाचा विमा योग्य विमापत्रकाखाली उतरविल्यासंबंधीच्या पृष्ठ्यर्थ विमापत्रक अथवा विमा स्विकारपत्र निर्गमित करण्यात येईल.

८. जर कोणत्याही कंत्राटदाराने उपरोक्त पध्दतीने विमापत्र न घेता परस्पर विमा कंपनीकडून विमापत्र घेतल्यास सदर विमापत्रके अग्राह्य असतील.

९. जेव्हा कंत्राटी कामाचे मूल्य रुपये ५० कोटींपेक्षा अधिक असेल, त्यावेळी कंत्राटदाराने विमा संचालनालयाच्या नामिकाप्रविष्ठसूची (empanelled) सर्वेक्षकांकडून विमापूर्व तपासणी अहवाल (Pre-Insurance Inspection of Risks) प्राप्त करून विहित नमुन्यातील विमाप्रस्तावपत्र विमा संचालनालयाकडे सादर केल्यानंतर व विमाहप्ता रक्कम प्रदान केल्यानंतर संबंधित कंत्राटदारास कंत्राटी कामाचा विमा थेट अथवा सहविमा सेवा पद्धतीखाली उतरविण्यासाठी पुढील कार्यवाही विमा संचालनालयाव्दारे केली जाईल. कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा संचालनालयाकडे अथवा विमा संचालनालयाच्या मान्यतेने सहविमा सेवा (Co-Insurance-cum-servicing) पद्धतीखाली उतरविला नसेल तर परिच्छेद क्रमांक (क) नुसार संबंधित प्रकर्ता यांनी कंत्राटदाराच्या देयकातून एकुण कंत्राटी मूल्याच्या रुपये १ % प्रमाणे सेवाकरासह रक्कम वळती करून विमा संचालनालयाकडे जमा करण्याची दक्षता घ्यावी.

**(ब)** विमा संचालनालयाचे मुख्यालय मुंबई तसेच, प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे आहे. विमा संचालनालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेले आहे. विमा संचालनालयाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ विचारात घेता, कंत्राटी कामाचा विमा व्यवहार हाताळताना मर्यादा येत आहेत. तसेच, महाराष्ट्राच्या अंतर्गत भागामध्ये असलेल्या कंत्राटदारास विमा संचालनालयाच्या मुंबई अथवा नागपूर येथील कार्यालयाकडे संपर्क साधून विमा उतरविणे काही प्रसंगी आर्थिकदृष्ट्या तसेच, वेळेअभावी सोईचे होत नाही. अशा प्रसंगी कंत्राटी कामाचा विमा व्यवहार हाताळण्यासाठी **विवरणपत्रनिहाय (Schedule Policy) विमा** उतरविण्याची कार्यपद्धत खालीलप्रमाणे आहे.

(अ) रुपये २५ लाखांपेक्षा कमी कंत्राटी मूल्याचे काम कंत्राटदारास सुपूर्द केले असल्यास संबंधित कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून एकूण कंत्राटी कामाच्या मूल्याच्या रुपये ०.५०% या दराने विमाहप्त्याची रक्कम कपात करून कार्यादेशाच्या प्रतीसह विमा संचालनालयाकडे " विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई " यांच्या नावे धनाकर्ष / धनादेश अथवा ग्रास प्रणालीद्वारे खालील विवरणपत्रात दोन प्रतीत ३० दिवसांत सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटी कामाचे नाव | कार्यादेश क्रमांक | कंत्राटी कामाचा कालावधी | कंत्राटी कामाचे मूल्य | रुपये ०.५० % प्रमाणे विमाहप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

संबंधित प्रकर्ता विमाहप्ता रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून वळती करून प्रदान करीत असल्यामुळे ३० दिवसांचा कालावधी क्षमापित करण्याचा अधिकार विमा संचालनालयाचे विभाग प्रमुख विमा संचालक यांचेकडे राहील.

संबंधित प्रकर्ता (Principal) यांचेकडून विमा संचालनालयास विवरणपत्रातील तपशिलासह विमाहप्ता प्राप्त झाल्यावर, विवरणपत्रनिहाय एकच विमापत्रक (Schedule Policy) निर्गमित करण्यात येईल. या विमापत्रका अंतर्गत कंत्राटदाराच्या संपूर्ण जोखीम विमापत्रकाखाली किंवा सागरी / साठवण-उभारणी विमापत्रकाखाली कंत्राटी कामाचा विमा उतरविला जाणार असल्याने, त्या विमापत्रकाच्या अटी व शर्तींनुसार विमाछत्राचा लाभ प्रकर्ता यांना मिळणार आहे. तसेच, संबंधित कंत्राटी कामाच्या ठिकाणी अपघातामुळे कामगारांना होणारे नुकसान श्रमिक नुकसानभरपाई विमापत्रकाच्या अटी व शर्तींनुसार स्विकारून विमा दावे निकाली काढले जातील.

(ब) जेव्हा कंत्राटदारास रुपये २५ लाखांपेक्षा अधिक रकमेचे कंत्राटी काम सुपूर्द केले असल्यास, कंत्राटदाराने विमा संचालनालयाच्या कार्यालयाकडे प्रत्यक्ष संपर्क साधून विहित नमुन्यातील विमाप्रस्तावपत्र सादर करणे अनिवार्य आहे. विमा संचालनालयाकडे विमाहप्ता रकमेचा भरणा केल्यावर संबंधित कंत्राटदारास विमा स्विकारपत्र / विमापत्र निर्गमित करण्यात येईल.

(क) जेव्हा कंत्राटी कामाचे मूल्य रुपये २५ लाखांपेक्षा जास्त असेल आणि जर कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा, विमा संचालनालयाकडे विमा उतरविल्याचा पुरावा म्हणून विमा संचालनालयाने निर्गमित केलेले विमास्विकारपत्र / विमापत्रक संबंधित प्रकर्ता (Principal) यांना सादर केले नाही. तर संबंधित प्रकर्ता यांनी एकुण कंत्राटी कामाच्या मूल्याच्या रुपये १ % या दराने कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून रक्कम वळती करून विमा संचालनालयाकडे धनाकर्ष / धनादेश अथवा ग्रास प्रणालीव्दारे कंत्राटदारनिहाय खालील विवरणपत्रासह ३० दिवसांत हस्तांतरित करण्याची दक्षता घ्यावी.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटी कामाचे नाव | कार्यादेश क्रमांक | कंत्राटी कामाचा कालावधी | कंत्राटी कामाचे मूल्य | रुपये १ % प्रमाणे विमाहप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**(क) कंत्राटी कामाचा कालावधी विस्तारित झाल्यास विमाहप्ता आकारण्याबाबतची कार्यपद्धती :–**

कंत्राटी कामाच्या प्रशुल्कामध्ये विमापत्रकाचा कालावधी संपल्यानंतर विमापत्रकाचा कालावधी विस्तारित करण्याची तरतूद / कार्यपद्धत विहित केलेली आहे. तथापि, प्रकर्ता यांच्याकडून संदर्भाधीन शासन परिपत्रकानुसार विमाहप्ता रक्कम जमा झाल्यानंतर कंत्राटी कामाच्या मूल्यामध्ये वाढ अथवा कंत्राटी कामाचा कालावधी विस्तारित झाल्यास आकारण्यात येणाऱ्या विमा हप्त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

***(१) प्रकर्ता यांनी कंत्राटदाराच्या देयकातून ०.५० किंवा १ टक्केप्रमाणे विमाहप्ता रक्कम जमा केली असल्यास :–***

(अ) जर कंत्राटदाराने विमा संचालनालयाकडे कंत्राटी कामाचा विमा उतरविल्याचा पुरावा म्हणून विमापत्रक / विमास्विकारपत्र प्रकर्ता यांना सादर न केल्यास, कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून शासन परिपत्रकानुसार विमा हप्त्याची रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे जमा केली असेल व त्यानंतर कंत्राटी कामाचा कालावधी विस्तारित झाला असेल तर, विस्तारित कालावधीकरिता विमाछत्राचा लाभ देण्यासाठी खालील कोष्टकात नमूद करण्यात आलेल्या दरानुसार एकूण कंत्राटी मूल्यावर रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे विहित पद्धतीने जमा करण्यात यावी.

| अनुक्रमांक | विस्तारित कालावधी | रक्कम कपात करावयाचा दर |
|---|---|---|
| १ | १ महिन्यापर्यंत | ०.२६८% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| २ | २ महिन्यांपर्यंत | ०.२८३% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ३ | ३ महिन्यांपर्यंत | ०.३०२% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ४ | ६ महिन्यांपर्यंत | ०.३३६% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ५ | ९ महिन्यांपर्यंत | ०.३७९% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ६ | १२ महिन्यांपर्यंत | ०.३९७% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ७ | १५ महिन्यांपर्यंत | ०.४१७% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ८ | १८ महिन्यांपर्यंत | ०.४३६% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| ९ | २१ महिन्यांपर्यंत | ०.४५५% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |
| १० | २४ महिन्यांपर्यंत | ०.४७४% अधिक प्रचलित वस्तू व सेवाकर |

(ब) २४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असल्यास संबंधित प्रकर्ता / कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष विमा संचालनालयाशी संपर्क साधून याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

(क) कंत्राटी कामाच्या मूल्यामध्ये वाढ झाल्यास, कंत्राटी कामाच्या वाढीव मूल्यावर शासन परिपत्रकानुसार ०.५०/१ टक्के तसेच विस्तारित कालावधीकरिता वरील कोष्टकात नमूद करण्यात आलेल्या दरानुसार एकूण कंत्राटी मूल्यावर (वाढीसह) रक्कम जमा करण्यात यावी.

**(२) *कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा, विमा संचालनालयाकडे उतरविला असल्यास :–***

कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा, विमा संचालनालयाकडे उतरविल्याबाबतचा पुरावा म्हणून विमा संचालनालयाने निर्गमित केलेले विमापत्र / विमास्विकारपत्र प्रकर्ता यांना सादर केले आहे. अशा कंत्राटी कामाच्या मूल्यामध्ये वाढ झाली असेल किंवा कामाचा कालावधी विस्तारित झाला असेल, तर संबंधित कंत्राटदाराला वाढीव मूल्याचा / कालावधी विमा उतरविण्यासाठी

प्रकर्ता यांनी निर्देश निर्गमित करावेत. जर, संबंधित कंत्राटदार यांनी याबाबतचा पुरावा प्रकर्ता यांना सादर केला नाही, अशा प्रसंगी, प्रकर्ता यांनी कंत्राटदाराच्या देयकातून परिच्छेद १ (अ) मधील कोष्टकामध्ये नमूद करण्यात आलेल्या दरानुसार रक्कम कपात करून विमा संचालनालयाकडे जमा करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कपात करण्यात आलेली विमा हप्त्याची रक्कम खालील विवरणपत्रातील तपशिलासह २ प्रतीत विमा संचालनालयाकडे " विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई " यांच्या नावे धनादेश / धनाकर्ष अथवा ग्रास संगणक प्रणालीत (GRAS - Government Receipt Accounting System) प्रकर्ता यांनी जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार, विवरणपत्रनिहाय सामाईक विमापत्रक / पृष्ठांकन निर्गमित करण्यात येईल.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटी कामाचे नाव | कार्यादेश क्रमांक | कंत्राटी कामाचा कालावधी | कंत्राटी कामाचे मूल्य | कपात केलेली विमाहप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**(ब) अप्रत्यक्ष पद्धत :**

राज्य शासनाच्या व विमा संचालनालयाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील / कार्यकक्षेतील विविध कार्यालये, संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरण, सार्वजनिक उपक्रम इत्यादी स्वत: सहविमा सेवा पद्धतीने सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांकडे संबंधित विमा कंपनीच्या अटी, शर्ती व विमादराप्रमाणे त्यांच्या दायित्त्वाचा व मालमत्तेचा विमा उतरवितात. या प्रकरणात अप्रत्यक्ष पद्धतीने विमा जोखीम स्वीकारली जाते व अशाप्रकारे परस्पर प्राप्त केलेल्या विमापत्राखाली विमा संचालनालय जोखीम स्वीकारते व त्रैमासिक पद्धतीने लेख्याचा ताळमेळ ठेवते.

शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग विमासं-२०२२/प्र. क्र. ०२/विमा प्रशासन, दिनांक ५ मे २०२२ द्वारे विमा संचालनालयाची प्रत्येक प्रकारच्या विमापत्रकाखाली महत्तम दायित्व मर्यादा रुपये ५०० कोटी इतकी सीमित / मर्यादित केली असल्याने प्रत्येक विभाग प्रमुखाने/कार्यालय प्रमुखाने विमा संचालनालयाच्या पूर्वमान्यतेने सहविमा करणे अनिवार्य आहे. या शासन निर्णयामुळे विमा महसुलावर प्रतिकूल परिणाम होईल. मात्र स्वीकृत विमा जोखीम कमी होणार आहे.

विमा संचालक हे विमा संचालनालयाचे प्रभारी अधिकारी असून विमा संचालनालयाचे प्रमुख अधिकारी आहेत. विमा संचालनालयाचे प्रमुख कार्यालय मुंबई व प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे कार्यरत असून, महाराष्ट्र राज्यातील सर्वत्र विखुरलेल्या शासकीय, निमशासकीय, स्वायत्त महामंडळे व सहकारी संस्था यांच्या विमाविषयक गरजा पूर्ण करण्याचे काम या निधीकडे असल्यामुळे स्थानिक विमासेवा काही अंशी उपलब्ध करून देण्यासाठी सहविमाकारांचे सहकार्य घ्यावे लागते.

विमा संचालकांच्या मदतीस गट 'अ' संवर्गातील एक (१) सहसंचालक, दोन (२) उपसंचालक, एक (१) लेखाधिकारी, तीन (३) सहायक संचालक व गट 'ब' संवर्गातील तेरा (१३) कनिष्ठ तांत्रिक अधिकारी नेमण्यात आले आहेत. गट 'क' व गट 'ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या क्रमश: ९२ व १३ आहे.

प्रसंगत: नमूद करण्यास अभिमान व आनंद वाटतो की, विमा संचालनालयाचे संस्थापक विमा अधिकारी श्री. गोविंद दिवाण (सन १९०१ ते १९८७) यांना दिनांक १७ जुलै २००८ रोजी तैपेयी येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय सम्मेलनात मृत्यू पश्चात विमा क्षेत्रातील सहा दशकांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल " हॉल ऑफ फेम अवॉर्ड " देऊन गौरविण्यात आल्यामुळे सन्मान करण्यात आलेला आहे. श्री. हरिश्चंद्र माणिकराव देशपांडे यांना विमा संचालक विभाग प्रमुख म्हणून सर्वसाधारण विमा क्षेत्रात विमा हप्त्याच्या स्वरूपात विनाकर महसुलाद्वारे महत्तम विमा स्वीकृती आधिक्य (Underwriting Surplus) संपादन करण्याच्या स्पृहणीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसायटीकडून ' भारतज्योती ' पुरस्कार व इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊसकडून ' बेस्ट सिटिझन ऑफ इंडिया २०१३ ' हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विमा संचालनालयास ही उपलब्धी अभिमानास्पद अशी आहे. महाराष्ट्र शासनाच्या विमा संचालनालयातील नव्हेतर, संपूर्ण भारत देशाला अभिमान वाटणारी ही गौरवशाली परंपरा जतन करण्याचा प्रयत्न विमा संचालनालय ही आस्थापना सातत्याने करीत असते. शासनाने विमा संचालनालय या कार्यालयाच्या आधुनिकीकरणास मान्यता दिली व अल्पावधीतच संपूर्ण कार्यालयाचे

आधुनिकीकरण करण्यात आले. या कार्यालयाच्या परिषद सभागृहाचे उद्‌घाटन राज्याचे मा. मुख्य सचिव, श्री. जयंतकुमार बांठिया यांच्या शुभहस्ते दिनांक ४ एप्रिल २०१३ रोजी करण्यात आले. त्यावेळी मा. मुख्य सचिवांनी अल्पावधीत अतिशय उत्कृष्ट काम केल्याबद्दल प्रशंसा केली व विमा संचालनालयाच्या वाणिज्यिक यशाबद्दल गौरोद्‌गार काढले. तसेच विमाधारकांना तत्पर व उच्च प्रतीची सेवा प्रदान करण्याच्या हेतूने शासनाने विमा संचालनालयाच्या संगणकीकरणास अनुमती देऊन सदर प्रकल्प आता पूर्णत्वास जात आहे. संगणकीकरणाच्या अनुषंगाने विमा संचालनालयास दि मंथन अवॉर्ड साउथ वेस्ट इंडिया या संस्थेने “ स्पेशल मेन्शन अवॉर्ड-२०१४ ” (Special Mention Award-2014) देऊन गौरन्वित केले आहे.

संगणकीकरणामुळे विमाधारक आता ऑनलाईन झालेल्या विमापत्रासंबंधी doi.maharashtra.gov.in संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन विमाविषयक कामकाज करू शकतात. त्यासाठी विमाधारकाने सदर संकेतस्थळावर जाऊन स्वत:स रजिस्टर केल्यानंतर त्यास युजर आयडी (user id) व पासवर्ड सिस्टिमकडून प्राप्त होतो. त्यानंतर विमाधारक आपले विमाविषयक कामकाज online करू शकतो.

राज्य शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली व्हर्चुअल ट्रेझरीची (Virtual Treasury) स्थापना केलेली असून प्रकर्ता (Principal) किंवा कोणताही विमाधारक आपल्या विमाहप्त्याच्या रकमा सदर व्हर्च्युअल ट्रेझरीमध्ये सहभागी बँकांच्या पेमेंट गेट वे चा वापर करून शासकीय जमा लेखांकन प्रणाली (GRAS) द्वारे प्रदान करू शकतात.

विमा संचालनालय हे राज्यस्तरीय कार्यालय आहे. कार्यालयातील सहायक विमा संचालक व उपविमा संचालक यांच्या संयुक्त पुढाकाराने व विमा संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली विमा संचालनालयात ‘ विमा प्रशिक्षण सत्र ’ किंवा ‘विमा चर्चासत्र’ दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ पासून आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येत असून यात सर्व अधिकारी / कर्मचारी उत्साहाने भाग घेत आहेत.

या प्रकाशनात विमा संचालनालयाचा कार्यक्रम तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. सोपविलेल्या कार्याच्या संदर्भात खात्याच्या कार्यक्रमाचे अभिज्ञान, खात्याच्या कार्यक्रम अर्थसंकल्पाच्या तंत्रात अंतर्भूत असते. मूळ अभिलक्षणांनुसार खात्याने ज्या कार्यक्रमांसाठी निधीची विनिर्देशपूर्वक मागणी केली आहे, अशाच कार्यक्रमांचा अंतर्भाव अर्थसंकल्पात केला जातो. त्यामुळे येथे विमा संचालनालयाच्या नियंत्रणाखालील समग्र अनुदानांचा हिशेब दाखविला आहे व ते प्रदर्शित केले आहे.

विमा अधिनियमानुसार विमा निधीचे लेखे सन १९८८-८९ पासून आर्थिक वर्षाप्रमाणे करण्यात आले आहेत.

विमा संचालनालयाकडून केल्या जाणाऱ्या कार्याच्या पृथ:करणानुसार खालील दोन ‘कार्यक्रम’ (Programmes) तयार करण्यात येत होते. तथापि, शासनाने दिनांक ५ नोव्हेंबर २००७ च्या आदेशान्वये आयुर्विमा निधी बंद केलेला आहे. त्यामुळे आयुर्विमा निधी कार्यक्रम तयार केला जात नाही.

(१) सर्वसाधारण विमा निधी.

(२) आयुर्विमा निधी.

## समग्र कार्यक्रम

विमा संचालनालयाची गेल्या तीन वर्षांतील प्रगती दाखविणारा तक्ता पुढीलप्रमाणे —

(रुपये हजारांत)

| वर्ष | विमा संचालनालयाने प्रदान केलेली अतितारण पत्रे | विमा संचालनालयाला मिळणारा विमा हप्ता | पुनर्विमाधारकांना व सहविमाधारकांना द्यावयाची स्थूल रक्कम | विमा संचालनालयाला मिळणारी विमा हप्त्याची निव्वळ रक्कम (स्तंभ ३ वजा स्तंभ ४) | शासनास वर्ग केलेली रक्कम | कालावधीच्या अखेरीस एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| २०१९-२०२० .. | 2,09,026 | 291,59,23 | 35,22,23 | 256,37,00 | 150,00,00 | 106,37,00 |
| २०२०-२०२१ .. | 1,43,193 | 203,42,79 | 32,60,12 | 170,82,67 | 150,00,00 | 20,82,67 |
| २०२१-२०२२ .. | 1,60,232 | 292,66,58 | 32,10,90 | 260,55,68 | 100,00,00 | 160,55,68 |

येथे असे निदर्शनास आणता येईल की, विमा संचालनालयाचे खर्चाचे प्रमाण अतिशय कमी आहे. एकूण विमा हप्त्याच्या रकमेशी झालेल्या खर्चाच्या प्रमाणाची गेल्या तीन वर्षांतील आकडेवारी पुढीलप्रमाणे :–

(रुपये हजारांत)

| | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ |
|---|---|---|---|
| एकूण विमा हप्त्याची रक्कम .. .. .. | 291,59,23 | 203,42,79 | 292,66,58 |
| व्यवस्थापनाचा खर्च .. .. .. | 6,52,32 | 5,55,83 | 6,41,76 |
| व्यवस्थापनाच्या खर्चाचे एकूण विमा हप्त्याच्या रकमेशी टक्केवारी .. | 2.24 | 2.73 | 2.19 |

दावे शीघ्रतेने निकालात काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जातात. साधारणत: दावे निकालात काढण्यासाठी कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर ३ महिने लागतात. न्यायालयीन प्रकरणे, सर्वेक्षण अहवाल, अत्यावश्यक सहाय्यभूत कागदपत्रे इत्यादी बाबींवर विमा संचालनालयाचे नियंत्रण नसल्याने विमा दावा निकाली काढण्यासाठी कालावधी अमर्याद लागू शकतो. विमा दावा निकाली काढण्याचे काम दाव्याचे स्वरूप व दावा करणाऱ्याने दाव्यासाठी लागणारी माहिती उपलब्ध करून देण्याबाबतचे सहकार्य यावर अवलंबून असते. दावा मागणाऱ्याने दाव्यास लागणारी सर्व माहिती दिली नाही तरच दावे मंजूर होण्यास उशीर होतो. विमाक्षेत्रातील पद्धतीनुसार सहविमा करण्याचा अधिकार हा विमाधारक व विमाकार या दोघांना असतो. विमा संचालनालयाच्या कार्यकक्षेतील शासकीय, निमशासकीय संस्था तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात विखुरलेले विविध सहकारी क्षेत्रातील विविध कारखाने व उद्योगधंदे हे शासकीय विमा निधीच्या अनुमतीने अथवा परस्पर सहविमा सेवा पद्धतीने विमा उतरवितात. या कार्यपद्धतीवर स्थानिक कार्यालयाच्या अभावी विमा संचालनालयाचे नियंत्रण नाही. सहविमादारांना विमा सेवा सहविमाकारांकडून दिली जाते, म्हणून सहविमा दावे सहविमाकारांकडून निकालात काढले जातात. भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाच्या चार दुय्यम विमाकारांपैकी एका अथवा अधिक विमाकारांकडे सहविम्याचे काम सुपूर्द केले जाते. ज्या विमादारांच्या बाबतीत सहविम्याचा अवलंब केलेला आहे असे विमेदार म्हणजे ज्यात सरकारी आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत असे सहकारी साखर कारखाने, सहकारी कताई गिरण्या वगैरे असे होत. ज्यावेळेस विमाविषयक अडचणी निर्माण होतात त्यावेळेस विमा संचालनालयाचे अधिकारी अडचणींचे निवारण करण्यासाठी त्वरित पाऊले उचलतात.

# कार्यक्रम

## १. सर्वसाधारण विमा निधी

**(एक) प्रस्तावना**

विमा संचालनालयाचा कारभार दिनांक ३१ ऑगस्ट १९७२ पर्यंत वित्त विभागामार्फत पाहिला जात होता. विमा शाखेतील कामांचे स्वरूप मंत्रालयातील कामांपेक्षा फार वेगळे होते. याचप्रमाणे विमा संचालनालयाला वाणिज्यिक धर्तीवर काम करावे लागते आणि भारतीय विमा संस्थेची विमाविषयक अर्हता असलेला अधिकारी / कर्मचारीवर्ग नेमावा लागतो. हे लक्षात घेऊन तसेच प्रशासकीय दृष्टीने शासनाने, दिनांक १ सप्टेंबर १९७२ पासून विमा संचालनालय या नावाचा एक वेगळा विभाग निर्माण करण्याचे ठरविले. विमा संचालक हे ह्या विभागाचे विभागप्रमुख असून विमा अधिनियम, १९३८ नुसार ते निधीचे प्रमुख अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. तद्वतच ते महाराष्ट्र विमा संचालनालयाच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी व प्रशासनासाठी जबाबदार आहेत. विमा संचालनालयातील भिन्न संवर्गातील अधिकारी नामनिर्देशन अथवा पदोन्नतीने नियुक्ती करण्यासाठी शासनाने नियुक्ती नियम निश्चित केले आहेत.

खालील तक्ता विमा निधीची गेल्या तीन वर्षांतील शिलकीची स्थिती आणि जमा व खर्च याची स्थिती दृष्टिक्षेपात दर्शवितो.

(रुपये हजारांत)

| वर्ष | | सुरुवातीची विमा निधीची शिल्लक | वर्षातील जमा | वर्षातील खर्च | शासनास वर्ग केलेली रक्कम | वर्षातील अखेरची शिल्लक * |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| २०२०-२०२१ | .. | 206,75,94 | 275,88,00 | 92,99,89 | 150,00,00 | 239,64,05 |
| २०२१-२०२२ | .. | 239,64,05 | 333,27,29 | 117,73,94 | 100,00,00 | 355,17,41 |
| २०२२-२०२३ | .. | 355,17,41 | 312,34,39 (E) | 169,46,72 (E) | 200,00,00 | 298,05,08 |

* शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक एआयएफ-२१८२/सीआर-१९२/८२/एडीएम-५, दिनांक १४ मे १९८२ याद्वारे असे ठरविण्यात आले की, विमा संचालनालयाची मर्यादा रुपये २५ कोटी इतकी ठेवावी व त्यावर जमा होणारा पैसा शासनाच्या एकत्रित निधीकडे जमा करण्यात यावा. या निर्णयामागील कल्पना अशी आहे की, जरुरीपेक्षा जास्त रक्कम अडविली न जाता राज्याच्या विकास कार्यासाठी त्याचा वापर व्हावा. या ठरावाची कार्यवाही म्हणून सन २०२२-२०२३ मध्ये विमा संचालनालयाकडून एकत्रित निधीकडे रुपये २३१५.८४ कोटी जमा करण्यात आले आहेत.

वाणिज्य व औद्योगिक उपक्रमांच्या विविधतेमुळे सर्वसाधारण विम्यांचे जवळजवळ सर्व मुख्य प्रकारचे विमे उपलब्ध करावे लागतात.

विमा संचालनालयाने हमी दिलेल्या सर्वसाधारण विमा व्यवसायाच्या प्रकारांची सूची खालीलप्रमाणे आहे :--

**आग विमा :**

(१) आग विमा.

**सागरी विमा :**

(२) बोटींच्या सांगाड्यांचा विमा.

(३) सागरी जहाज माल विमा (समुद्रावर व आंतरदेशीय).

**संकीर्ण विमा :**

(४) मोटार वाहन विमा.

(५) सागरी, साठवण व उभारणी विमा.

(६) वाटचालीतील रोख रक्कम आणि तिजोरीतील रोख रक्कम विमा.

(७) इमान हमी विमा.

(८) घरफोडी विमा.

(९) कामगार नुकसानभरपाई विमा.

(१०) विमानचालक विमा.

(११) व्यक्तिगत अपघात विमा.

(१२) जनता वैयक्तिक अपघात विमा.

(१३) त्रयस्थ पक्षभार विमा.

(१४) विद्युत उपकरणाचा विमा.

(१५) यंत्रसामग्री विमा.

(१६) बॉयलर स्फोट विमा.

(१७) कंत्राटदाराचा पूर्ण हमीचा विमा.

ह्या व्यतिरिक्त वाणिज्य व औद्योगिक उपक्रमांच्या विशिष्ट गरजांकरिता विशेष आकस्मिक विमापत्रे देण्यात येतात.

२०२२-२०२३ सालचे लेखा तयार करण्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे त्या वर्षासाठी कार्यक्रमनिहाय तपशिलांच्या तक्त्यामध्ये दाखविलेले आकडे हे पूर्णपणे अंदाजित आहेत.

---

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता समूह वैयक्तिक अपघात विमा योजना

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र. क्र. १९/विमा प्रशासन, दिनांक १८ फेब्रुवारी २०१७ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांकरिता लाभदायी ठरणारी " राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना " दिनांक १ एप्रिल २०१७ पासून यापुढे सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर अपघात विमा योजना शासन निर्णय क्रमांक, संकीर्ण-२०१७/प्र. क्र. ६९/ विमा प्रशासन, दिनांक ११ ऑगस्ट २०१७ अन्वये राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद, नगरपंचायती, शासकीय महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, सांविधानिक संस्था, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था / महाविद्यालये. कृषि विद्यापीठे, पारंपरिक विद्यापीठे यांचे अधिकारी / कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून) यांना यावर्षी दिनांक १ ऑगस्ट २०१७ पासून ही योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजना सर्वस्वी वैयक्तिक वर्गणीवर आधारित आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्वरूपाची असून, सदस्यास अपघाती मृत्यू अथवा कायमस्वरूपी अपंगत्व / विकलांगता आल्यास, ठोस रकमेच्या स्वरूपात नुकसानभरपाई देण्याची तरतूद आहे. सदर विमा योजना, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येत असून, या योजनेखाली खालीलप्रमाणे लाभ अनुज्ञेय असतील :–

| अ. क्र. | अपघाताचे स्वरूप | भरपाईची राशीभूत रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अपघातामुळे आलेला मृत्यू | १०० टक्के |
| २ | अपघातामुळे आलेले कायमचे अपंगत्व / विकलांगता | १०० टक्के |
| ३ | अपघातात दोन हात, दोन पाय किंवा दोन्ही डोळे गमावून अपंगत्व / विकलांगता आल्यास. | १०० टक्के |
| ४ | अपघातामध्ये एक हात, पाय अथवा डोळा गमावून अपंगत्व / विकलांगता आल्यास. | ५० टक्के |
| ५ | कायमचे अंशतः अपंगत्व / विकलांगतेच्या स्वरूपानुसार | १ ते ५० टक्के |

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दिनांक २४ जानेवारी २०२३ अन्वये १ एप्रिल २०२३ पासून राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची वर्गणी व राशीभूत रक्कम (Capital Sum Insured) गटनिहाय यामध्ये वाढ करण्यात आली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| गट | राशीभूत विमा रक्कम | वार्षिक वर्गणी | वस्तू व सेवाकर | एकूण वार्षिक वर्गणी |
|---|---|---|---|---|
| गट-अ | रु. २५ लाख | रु. ७५०/- | रु. १३५/- | रु. ८८५/- |
| गट-ब | रु. २० लाख | रु. ६००/- | रु. १०८/- | रु. ७०८/- |
| गट-क | रु. १५ लाख | रु. ४५०/- | रु. ८१/- | रु. ५३१/- |
| गट-ड | रु. १५ लाख | रु. ४५०/- | रु. ८१/- | रु. ५३१/- |

महाराष्ट्र शासनाने राज्य शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कायदेशीर वारसांना समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेखाली, विमा संरक्षण दिले आहे.

---

**तक्ता १**

**(दोन) एकूण अर्थसंकल्पीय तरतुदींबाबत कार्यक्रमनिहाय तपशील, वित्तीय आवश्यकता व वित्तीय व्यवस्थेची साधने**

| अनु क्रमांक Sr. No. 1 | कार्यक्रम 2 | | प्रत्यक्ष रकमा २०२१-२०२२ Actuals, 2021-2022 महसूल Revenue 3 | भांडवली Capital 4 | एकूण Total 5 | अर्थसंकल्प २०२२-२०२३ Budget Estimates, 2022-2023 महसूल Revenue 6 | भांडवली Capital 7 | एकूण Total 8 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अनिवार्य-सर्वसाधारण विमा निधी | .. | 117,56,52 | __ | 117,56,52 | 144,10,82 | __ | 144,10,82 |
| | कार्यक्रम | .. | — | — | — | — | — | — |
| | अनिवार्य-आयुर्विमा निधी | .. | — | — | — | — | — | — |
| | कार्यक्रम | .. | — | — | — | — | — | — |
| | अनिवार्य-एकूण | .. | 117,56,52 | __ | 117,56,52 | 144,10,82 | __ | 144,10,82 |
| | कार्यक्रम | .. | — | — | — | — | — | — |
| | अनिवार्य-वजा-वसुली | .. | 117,56,52 | __ | 117,56,52 | 144,10,82 | __ | 144,10,82 |
| | कार्यक्रम | .. | — | — | — | — | — | — |
| | अनिवार्य-एकूण निव्वळ | .. | — | — | — | — | — | — |
| | कार्यक्रम | .. | — | — | — | — | — | — |

TABLE I

**Programmewise details of Total Budget Estimates, Financial Requirements and Sources of Finance**

(अनिवार्य / Committed)

(रुपये हजारांत / Rs. in thousands)

| सुधारलेले अंदाज २०२२-२०२३ Revised Estimates, 2022-2023 | | | अर्थसंकल्प २०२३-२०२४ Budget Estimates, 2023-2024 | | | | Programme |
|---|---|---|---|---|---|---|---|
| महसूल Revenue 9 | भांडवली Capital 10 | एकूण Total 11 | महसूल Revenue 12 | भांडवली Capital 13 | एकूण Total 14 | | 2 |
| 142,85,56 | __ | 142,85,56 | 112,55,51 | __ | 112,55,51 | .. | Committed-General Insurance Fund |
| — | — | — | — | — | — | .. | Scheme |
| — | — | — | — | — | — | .. | Committed-Life Insurance Fund |
| — | — | — | — | — | — | .. | Scheme |
| 142,85,56 | __ | 142,85,56 | 112,55,51 | __ | 112,55,51 | .. | Total-Committed |
| — | — | — | — | — | — | .. | Scheme |
| 142,85,56 | __ | 142,85,56 | 112,55,51 | __ | 112,55,51 | .. | Committed-Deduct Recoveries |
| — | — | — | — | — | — | .. | Scheme |
| — | — | — | — | — | — | .. | Net Total-Committed |
| — | — | — | — | — | — | .. | Scheme |

**तक्ता २**

**(दोन) वित्तीय आवश्यकता**

| | | प्रत्यक्ष रकमा, २०२१-२०२२ Actuals, 2021-2022 | | | अर्थसंकल्प, २०२२-२०२३ Budget Estimates, 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य Committed | कार्यक्रम Scheme | एकूण Total | अनिवार्य Committed | कार्यक्रम Scheme | एकूण Total |
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **(अ) कार्यनिहाय वर्गीकरण** | | | | | | | |
| विमा निधीचे व्यवस्थापन | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| एकूण | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| वजा वसुली (-) | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| एकूण निव्वळ | .. | – | – | – | – | – | – |
| **(ब) उद्दिष्टनिहाय वर्गीकरण** | | | | | | | |
| विमा निधीचे व्यवस्थापन | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण विमा निधी | | | | | | | |
| ०१ वेतन | .. | 5,34,38 | – | 5,34,38 | 8,07,91 | – | 8,07,91 |
| ०३ अतिकालिक भत्ता | .. | 15 | – | 15 | 30 | – | 30 |
| ०४ निवृत्तीवेतन विषयक | .. | 37,89 | – | 37,89 | 41,30 | – | 41,30 |
| ०६ दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | .. | 3,16 | – | 3,16 | 5,00 | – | 5,00 |
| १० कंत्राटी सेवा | .. | 19,18 | – | 19,18 | 30,00 | – | 30,00 |
| ११ देशांतर्गत प्रवास खर्च | .. | 58 | – | 58 | 2,54 | – | 2,54 |
| १३ कार्यालयीन खर्च | .. | 14,39 | – | 14,39 | 28,00 | – | 28,00 |
| १४ भाडे, पट्टी व कर / स्वामित्व धन | .. | 44,57,00 | – | 44,57,00 | 34,57,00 | – | 34,57,00 |
| १७ संगणकावरील खर्च | .. | 8,71 | – | 8,71 | 36,97 | – | 36,97 |
| २८ व्यावसायिक सेवा | .. | 2,60 | – | 2,60 | 1,80 | – | 1,80 |
| एकूण (१) | .. | 50,78,04 | – | 50,78,04 | 44,10,82 | – | 44,10,82 |
| (२) ५० पुनर्विमाकार व सहविमाधारकांना द्यावयाचा विमा हप्ता | | 29,75,71 | – | 29,75,71 | 40,00,00 | – | 40,00,00 |
| एकूण (२) | .. | 29,75,71 | – | 29,75,71 | 40,00,00 | – | 40,00,00 |
| (३) ५० विमाधारकांना व त्रयस्थ पक्षांना द्यावयाच्या मागणीच्या रकमा | | 37,02,77 | – | 37,02,77 | 60,00,00 | – | 60,00,00 |
| एकूण (३) | .. | 37,02,77 | – | 37,02,77 | 60,00,00 | – | 60,00,00 |
| एकूण (ब) | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| वजा वसुली (-) | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| एकूण निव्वळ | .. | – | – | – | – | – | – |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने** | | | | | | | |
| मागणी क्रमांक जी-७ | | | | | | | |
| २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण | | | | | | | |
| ६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम | | | | | | | |
| १०१- विमा योजना | | | | | | | |
| सर्वसाधारण विमा निधीचे व्यवस्थापन | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| वजा वसुली (-) | .. | 117,56,52 | – | 117,56,52 | 144,10,82 | – | 144,10,82 |
| एकूण निव्वळ | .. | – | – | – | – | – | – |

TABLE II

**(ii) Financial Requirements**

(रुपये हजारांत / Rs. in thousands )

| सुधारित अंदाज, २०२२-२०२३ Revised estimates, 2022-2023 | | | अर्थसंकल्प, २०२३-२०२४ Budget estimates, 2023-2024 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य Committed | कार्यक्रम Scheme | एकूण Total | अनिवार्य Committed | कार्यक्रम Scheme | एकूण Total | | |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | | 1 |
| | | | | | | | *(A) Activity Classification--* |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | .. | Management of Insurance Fund |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | | .. Total |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | | .. *Deduct-Recoveries* |
| – | – | – | – | – | – | .. | Total Net |
| | | | | | | | *(B) Objectwise Classification--* |
| | | | | | | | Management of Insurance Fund |
| | | | | | | | ( i ) General Insurance Fund-- |
| 6,95,00 | – | 6,95,00 | 8,88,70 | – | 8,88,70 | .. | 01 Salaries |
| 30 | – | 30 | 30 | – | 30 | .. | 03 Overtime Allowances |
| 41,30 | – | 41,30 | 45,43 | – | 45,43 | .. | 04 Pensionery Charges |
| 4,50 | – | 4,50 | 5,00 | – | 5,00 | .. | 06 Telephone, Electricity and Water Charges |
| 30,00 | – | 30,00 | 35,00 | – | 35,00 | .. | 10 Contractual Services |
| 1,78 | – | 1,78 | 2,67 | – | 2,67 | .. | 11 Domestic Travel Expenses |
| 28,00 | – | 28,00 | 29,40 | – | 29,40 | .. | 13 Office Expenses |
| 49,57,00 | – | 49,57,00 | 2,08,39 | – | 2,08,39 | .. | 14 Rent, Rates and Taxes |
| 25,88 | – | 25,88 | 38,82 | – | 38,82 | .. | 17 Computer Expenses |
| 1,80 | – | 1,80 | 1,80 | – | 1,80 | .. | 28 Professional Services |
| 57,85,56 | – | 57,85,56 | 12,55,51 | – | 12,55,51 | .. | Total ( i ) |
| 40,00,00 | – | 40,00,00 | 40,00,00 | – | 40,00,00 | .. | ( ii ) 50 Re-Insurance and/or Co-Insurance Premium Payable |
| 40,00,00 | – | 40,00,00 | 40,00,00 | – | 40,00,00 | .. | Total ( ii ) |
| 45,00,00 | – | 45,00,00 | 60,00,00 | – | 60,00,00 | .. | ( iii ) 50 Claims payable to Insured and Third Parties. |
| 45,00,00 | – | 45,00,00 | 60,00,00 | – | 60,00,00 | .. | Total ( iii ) |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | .. | Total ( B ) |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | .. | *Deduct--Recoveries* |
| – | – | – | – | – | – | .. | Total Net |
| | | | | | | | *( C ) Source of Finance--* |
| | | | | | | | Demand No. G-7 |
| | | | | | | | 2235--Social Security and Welfare Programmes |
| | | | | | | | 60--Other Social Security and Welfare Programmes --101 Insurance Scheme |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | .. | ( i ) General Insurance Funds |
| 142,85,56 | – | 142,85,56 | 112,55,51 | – | 112,55,51 | .. | *Deduct--Recoveries* |
| – | – | – | – | – | – | .. | Total Net |

**तक्ता ३**

## (तीन) कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश, वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण

### विमा प्रस्ताव

खालील विवरणामध्ये चालू वर्षात आलेल्या प्रस्तावांची संख्या, त्यापैकी प्रस्ताव किती निकालात काढले व किती प्रस्ताव शिल्लक राहिले हे दर्शविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जे प्रस्ताव आले त्यांच्या जोखीमेची रक्कमसुद्धा स्वतंत्रपणे दर्शविण्यात आली आहे. विमापत्रक निर्गमित करण्यापूर्वी विमा प्रस्तावाची संपूर्णपणे छाननी करणे आवश्यक असते. आवश्यक माहिती विमा प्रस्तावकाकडून मागवावी लागते. यामुळे ज्यावर्षी विमा प्रस्ताव येतात त्या वर्षी तो निकालात काढणे शक्य नसते. तरीसुद्धा जे प्रस्ताव निर्गमित करण्यात येतात, त्यावरून कार्यक्रमाच्या कार्यभाराची कल्पना येते.

(रुपये हजारांत / Rs. in thousands)

| अनु-क्रमांक Sr. No. | विमा प्रकार | आग विमा Fire | | | सागरी विमा Marine | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२०२१ 2020-2021 | २०२१-२०२२ 2021-2022 | २०२२-२०२३ 2022-2023 | २०२०-२०२१ 2020-2021 | २०२१-२०२२ 2021-2022 | २०२२-२०२३ 2022-2023 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| **१** | **वर्षाच्या सुरुवातीला शिल्लक प्रस्ताव** | | | | | | |
| | (अ) प्रस्तावांची संख्या .. | — | — | — | — | — | — |
| **२** | **चालू वर्षात आलेले प्रस्ताव** | | | | | | |
| | (अ) प्रस्तावांची संख्या .. | 1,515 | 1,940 | 2,025 | 528 | 421 | 562 |
| | (ब) जोखीमेची रक्कम (रुपये) .. | 20381,91,92 | 20876,57,17 | 21021,47,04 | 145,66,23 | 203,12,23 | 259,58,20 |
| **३** | **चालू वर्षात निर्गमित केलेली विमापत्रके** | | | | | | |
| | (अ) विमापत्रकांची संख्या .. | 1,515 | 1,940 | 2,025 | 528 | 421 | 562 |
| | (ब) जोखीमेची रक्कम (रुपये) .. | 20381,91,92 | 20876,57,17 | 21021,47,04 | 145,66,23 | 203,12,23 | 259,58,20 |
| **४** | **वर्ष अखेरीस शिल्लक राहिलेले प्रस्ताव** | | | | | | |
| | (अ) विमापत्रकांची संख्या .. | — | — | — | — | — | — |

TABLE III

## (iii) Programme workload summary and explanation of financial requirements

## Insurance Proposals

The following table shows the quantum of the insurance proposals received during each year, disposed of during the year and the number of proposals remaining outstanding at the end of the year. The value of the property covered by insurance is also shown along side information. Before an insurance policy is issued the proposal has to be scrutinized. The information which is called for from the proponent. Therefore, all the proposals received during the year cannot be disposed of in the same year. However, the number of policies issued during the year indicates the workload of the Department.

(रुपये हजारांत / Rs. in thousands)

| संकीर्ण विमा Miscellaneous | | | एकूण Total | | | Type of Business |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२०-२०२१ 2020-2021 | २०२१-२०२२ 2021-2022 | २०२२-२०२३ 2022-2023 | २०२०-२०२१ 2020-2021 | २०२१-२०२२ 2021-2022 | २०२२-२०२३ 2022-2023 | |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 1 |
| | | | | | | (1) Proposals outstanding on 31st March– |
| — | — | — | — | — | — | .. (a) No. of Proposals |
| | | | | | | (2) Proposals received during the year– |
| 1,32,652 | 1,47,717 | 1,51,703 | 1,34,695 | 1,50,078 | 1,54,290 | .. (a) No. of Proposals |
| 90016,89,93 | 196640,11,94 | 215112,99,99 | 110544,48,08 | 217719,81,34 | 236394,05,23 | .. (b) Amount of Risk (in Rs.) |
| | | | | | | (3) Policies/Covers issued during the year– |
| 1,32,652 | 1,47,717 | 1,51,703 | 1,34,695 | 1,50,078 | 1,54,290 | .. (a) Policies/Covers issued |
